दैनिक
# अदिती एक्सप्रेस

- दि. १० फेब्रुवारी २०२६
- मंगळवार
- वर्ष ४ थे
- अंक ९८
- किंमत २ रूपये
- पृष्ठे ४
- लातूर
- RNINO.MHMAR/25/A1409

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे ईमेल-aditiexpress33@gmail.com, **Website: www.aditiexpress.in**


### आजचे पंचाग

- दिनांक : १० फेब्रुवारी २०२६
- वार : मंगळवार
- माह (अमावस्यांत) : माघ
- माह (पूर्णिमांत) : फाल्गुन
- ऋतु : शिशिर
- आयन : उत्तरायण
- पक्ष : कृष्ण पक्ष
- तिथी : अष्टमी तिथी (सकाळी ०७:२७ पर्यंत) त्यानंतर नवमी तिथी
- नक्षत्र : विशाखा नक्षत्र (सकाळी ०७:५४ पर्यंत) त्यानंतर अनुराधा नक्षत्र
- योग : ध्रुव योग (११ फेब्रुवारी पहाटे ०१:४२ पर्यंत) त्यानंतर व्याघात योग
- करण : कौलव करण (सकाळी ०७:२७ पर्यंत) त्यानंतर तैतुला करण
- चंद्र राशी : वृश्चिक राशी
- सूर्य राशी : मकर राशी
- अशुभ मुहूर्त:
- राहु काळ : दुपारी ०३:४२ ते सायंकाळी ०५:०७ पर्यंत
- शुभ मुहूर्त:
- अभिजित : दुपारी १२:२९ ते दुपारी ०१:१५
- सूर्योदय : सकाळी ०७:११
- सूर्यास्त : सायंकाळी ०६:३५
- संवत्सर : विश्वावसु
- संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
- विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
- शक संवत: १९४७ शक संवत

# भारत-फ्रान्स संरक्षण करार निर्णायक टप्प्यात

## हवाई दलाची ताकद वाढवण्यासाठी ११४ राफेलची खरेदी

नवी दिल्ली : भारत आपल्या हवाई दलाची ताकद वाढवण्यासाठी सतत काम करत आहे. अत्याधुनिक राफेल विमाने आधीच हवाई दलाच्या ताफ्यात आहेत. ११४ राफेल विमाने खरेदी करण्याची प्रक्रिया आता वेगवान करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या भारत भेटीपूर्वी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली संरक्षण अधिग्रहण परिषदेची बैठक होणार आहे. या बैठकीत ३.२५ लाख कोटी रुपयांच्या ११४ राफेल विमानांच्या खरेदीला मान्यता मिळू शकते ऑपरेशन सिंदूरपासून, भारत आपल्या संरक्षण क्षेत्राला वेगाने बळकटी देत आहे. १८ से २० फेब्रुवारी दरम्यान भारतात एआय शिखर परिषद होणार आहे, ज्यामध्ये इमॅन्युएल मॅक्रॉन देखील सहभागी होतील.



टाईम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार, या प्रस्तावित प्रकल्पात १८ विमाने उडत्या स्थितीत खरेदी केली जातील आणि त्यातील ६०% विमाने भारतात तयार केली जातील. या ११४ विमानांपैकी ८० टक्के विमाने भारतात तयार केली जाऊ शकतात. अहवालांनुसार, या प्रकल्पांतर्गत ८८ सिंगल-सीटर आणि २६ ट्विन-सीटर विमाने खरेदी करता येतील. यापैकी बहुतेक विमाने भारतात तयार केली जातील. डसॉल्ट आणि भारतीय खाजगी क्षेत्रातील कंपन्या संयुक्तपणे विमानांची निर्मिती करतील. गेल्या महिन्यात, या प्रकल्पाला संरक्षण अधिग्रहण मंडळाने मान्यता दिली होती. आता, पुढील स्तरावर या प्रकल्पाला मान्यता देणे आवश्यक आहे. त्यानंतर, तांत्रिक आणि व्यावसायिक पातळीवर औपचारिक वाटाघाटी सुरू होतील. **(पान २ वर)**

## शरद पवारांची प्रकृती खालावली

बारामती- बारामतीच्या राजकीय वर्तुळातून एक महत्त्वाची अपडेट समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ खासदार



शरद पवार यांची प्रकृती खालावल्याची बातमी समोर आली आहे. शरद पवार यांना तातडीने रुग्णवाहिकेतून पुण्याच्या दिशेने हलवण्यात आले आहे. त्यांच्यासोबत खासदार सुप्रिया सुळे आणि पती सदानंद सुळेहेदेखील आहेत.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, आज सकाळी १०:३० च्या सुमारास दोन तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक गोविंद बागेत दाखल झाले होते. सुमारे तासभर चाललेल्या वैद्यकीय तपासणीनंतर शरद पवार यांना खोकला आणि कफामुळे श्वास घेण्यास त्रास होत असल्याचे समोर आले. **(पान २ वर)**

# ‘संघाने सांगावे राजीनामा देतो!’

## ७५ वर्षे वयोमानावर मोहन भागवत यांचे मोठे विधान

मुंबई : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दीनिमित्त आयोजित ‘संघाच्या प्रवासाची १०० वर्षे-नवीन क्षितिज’ या दोन दिवसांच्या व्याख्यानमालेच्या दुसऱ्या दिवशी (रविवार) सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी संघटनेचे कामकाज, भविष्यातील दिशा आणि नेतृत्व याबाबत अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले. संघातील पदापेक्षा काम महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले, मुंबईतील नेहरू सेंटरमध्ये आयोजित व्याख्यानमालेत त्यांच्या निवृत्तीबद्दलच्या चर्चेला पूर्णविराम देताना मोहन भागवत म्हणाले की, वयाच्या ७५ वर्षांनंतर व्यक्तीने कोणतेही पद न घेता काम करावे असे सर्वसाधारणपणे मानले जाते. मी ७५ वर्षे पूर्ण केली आहेत आणि संघाला याबद्दल माहिती दिली आहे. परंतु संघटनेने मला काम करत राहण्यास सांगितले आहे. ज्यादिवशी संघ मला पद सोडण्याचे निर्देश देईल, त्यादिवशी मी ताबडतोब राजीनामा देईन. काम शेवटच्या श्वासापर्यंत सुरू राहील, असेही त्यांनी सांगितले.



भागवत यांनी पुनरुच्चार केला. ते म्हणाले की, संघ संविधानाने प्रदान केलेल्या आरक्षणाचे पूर्ण समर्थन करतो आणि समाजातील वंचित घटकांमध्ये त्याची गरज नाहीशी होईपर्यंत ते चालू राहिले पाहिजे. अखंड भारतावर विश्वास व्यक्त करताना ते म्हणाले की, २०४७ पर्यंत अखंड भारताचा उदय निश्चित आहे. ब्रिटिश २०० -वर्षात भारताचे विभाजन करू शकले नाहीत, म्हणूनच आजही जे भारताचे विभाजन करण्याचा विचार करत आहेत, पण ते स्वतःच विखुरतील.

बांगलादेशचा संदर्भ देत ते म्हणाले की, बांगलादेशात सव्वा कोटी हिंदू आहेत. जर त्यांनी एकत्र येऊन लढण्याचा निर्णय घेतला तर जगभरातील हिंदू त्यांना मदत करण्यासाठी पुढे येतील, असपण जागरूक राहण्याची गरज आहे. संघाच्या भविष्याबद्दल बोलताना मोहन भागवत म्हणाले की, सरसंघचालकासाठी कोणतीही निवडणूक नाही, **(पान २ वर)**

# कारेगावच्या माजी सरपंच निर्मला नवलेंचा पराभव; भाजपच्या मनीषा पाचंगेंनी मारली बाजी

मुंबई: समाज माध्यमावर प्रचंड फेमस असणाऱ्या शिरुर तालुक्यातील कारेगावच्या माजी सरपंच निर्मला नवले यांना यंदाच्या निवडणुकीत पराभवाचा धक्का बसला आहे. निर्मला नवले या राष्ट्रवादी काँग्रेसकडून शिरुर पंचायत समितीच्या कारेगाव कान्हूर मेसाई गण येथून निवडणुकीला उभ्या होत्या. निर्मला नवले या सोशल मीडियावर प्रचंड लोकप्रिय आहेत. आजवर त्यांचे अनेक रिल्स आणि व्हिडीओ समाज माध्यमावर व्हायरल झाले



आहेत. परंतु, यंदाच्या पंचायत समिती निवडणुकीत त्यांना हार पत्करावी लागली आहे. भाजपच्या मनीषा सतीश पाचंगे यांनी निर्मला नवले यांना ३०० मतांनी पराभूत केले.

पुणे जिल्ह्यातील कारेगावच्या माजी सरपंच निर्मला नवले या कायमच सोशल मीडियावर चर्चेचा विषय असतात. निर्मला नवले या राजकारणी असल्या तरी इन्स्टाग्रामवर त्यांचे पाच लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत. निर्मला नवले यांनी आयटी इंजीनिअरिंगचं शिक्षण पूर्ण केले आहे. काही वर्षांपूर्वी निर्मला नवले यांची कारेगावच्या सरपंचपदी बिनविरोध निवड झाली होती. तेव्हापासून त्यांची लोकप्रियता प्रचंड वाढत गेली. उच्चशिक्षित आणि लोकप्रिय चेहरा म्हणून निर्मला नवले या कायम चर्चेत असायच्या. मात्र, यंदाच्या निवडणुकीत निर्मला नवले यांची जादू चालू शकली नाही. दरम्यान पुणे जिल्हा परिषदेच्या एकूण २९९ जागांपैकी ७३ जागांचे निकाल हाती आले आहेत. यामध्ये भाजपचे २०, शिवसेनेचे ७, राष्ट्रवादी काँग्रेसचे २७, ठाकरे गटाचे २ आणि शरद पवार गटाचे ३ उमेदवार विजयी झाले आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर पुण्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीचा प्रचार पूर्णपणे थंडावला होता. पुण्यात एकही मोठी सभा झाली नव्हती. अजितदादांच्या निधनानंतर पुणे जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसला सहानुभूती मिळताना दिसत आहे.

# जिल्हा परिषदेत उबाठा हाती भोपळा, आजवरचा सर्वात मानहानीकारक पराभव

मुंबई : राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीत भाजप आणि महायुतीने निर्णायक विजय मिळवला असला, तरी उबाठा गटाला जिल्हा परिषदेत एकही जागा जिंकता आलेली नाही. त्यामुळे आजवरचा हा त्यांचा सर्वात मानहानीकारक पराभव ठरला असून, ग्रामीण भागातील जनतेने उबाठा गटाला स्पष्ट नाकारले, हे या निकालातून स्पष्ट झाले आहे.

उबाठा गटाला जिल्हा परिषदेत एकही जागा जिंकता



आली नाही. तर, पंचायत समितीतही त्यांची कामगिरी अत्यंत निराशाजनक राहिली. या निवडणुकीत भाजप राज्यातील नंबर एकचा पक्ष ठरला असून, भाजपची ग्रामीण भागातील पकड किती खोलवर रुजली आहे, हे निकालातून स्पष्ट झाले आहे. भाजपनंतर एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांनी सरस कामगिरी केली आहे.

राज्यातील १२ जिल्हा परिषदांपैकी सात जिल्हा परिषदांवर भाजपने वर्चस्व मिळवले आहे. शिवसेनेला दोन जिल्हा परिषदांमध्ये सत्ता मिळाली आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेसलाही दोन जिल्हा परिषदांमध्ये **(पान २ वर)**

## वळसे पाटील, तानाजी सावंत, भरत गोगावलेंनी गड राखले

मुंबई : राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीत अनेक ठिकाणी प्रस्थापित नेत्यांच्या कुटुंबीयांनी आपला दबदबा कायम ठेवत विजय मिळवला. माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, तानाजी सावंत आणि मंत्री भरत गोगावले यांच्या कुटुंबीयांनी गड राखत राजकीय वारसा पुढे नेला, तर काही ठिकाणी मतदारांनी घराणेशाहीला स्पष्ट नकार दिल्याचेही चित्र पाहायला मिळाले.

आंबेगाव मतदारसंघात माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे पुतणे विवेक वळसे पाटील यांनी पारगाव जरकवाडी गटातून २ हजार १३० मतांची निर्णायक आघाडी घेत विजय निश्चित केला. पुरंदर तालुक्यात माजी आमदार बापूसाहेब पठारे यांची कन्या रूपाली झेंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या चिन्हावर विजय मिळवला. विशेष म्हणजे, पुरंदर तालुक्यातील दोन्ही पंचायत समिती सदस्यही राष्ट्रवादी काँग्रेसचेच निवडून आल्याने तालुक्यावर पक्षाची पकड अधिक मजबूत झाली आहे. सोलापूर जिल्ह्यातील हाय-व्होल्टेज लढतींमध्येही प्रस्थापित नेत्यांच्या कुटुंबीयांनी बाजी मारली आहे.

**(पान २ वर)**

# लातूरमध्ये ‘हात’ सुसाट! जिल्हा परिषदेत काँग्रेसची ऐतिहासिक मुसंडी

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर - जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक २०२६ चे निकाल स्पष्ट झाले असून, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने जिल्ह्यावर आपले निर्विवाद वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. ‘विकासाची परंपरा आणि विलासरावजींचा विचार‘ यावर लातूरच्या मतदारांनी शिक्कामोर्तब केले असून, काँग्रेसने जिल्ह्यात विजयाचा मोठा गुलाल उधळला आहे. काँग्रेस पक्षाने जिल्हाभरात जोरदार मुसंडी मारत बहुमताचा जवळ जाणारा आकडा पार केला आहे.



बाभळगावात जल्लोष आणि ’लोकनेत्यांना’ अभिवादन

निवडणूक निकाल जाहीर होताच विजयी उमेदवारांनी आणि कार्यकर्त्यांनी बाभळगावच्या दिशेने धाव घेतली. विजयाचा गुलाल आणि ढोल-ताशांच्या गजरात नवनियुक्त सदस्यांनी बाभळगाव निवासस्थानी भेट दिली. जिल्हा परीषद व पंचायत समिती महाराणा प्रतापनगर, पांखरसांगवी, काटगाव, हरंगुळ बु, साकोळ, तांदुळजा आदीसह विजयी उमेदवारांनी बाभळगाव येथे भेट दिली.

देशमुख कुटुंबीयांकडून स्वागत:

**(पान २ वर)**

# पुण्यात महापौर, उपमहापौर पदासाठी बिनविरोध निवडणूक

पुणे: भाजपच्या मंजुषा नागपुरे यांची पुण्याच्या महापौर पदी, तर भाजप-रिपब्लिकन पक्षाचे परशुराम वाडेकर यांची उपमहापौर पदी आज म्हणजेच सोमवार ९ फेब्रुवारी रोजी बिनविरोध निवड झाली आहे.

काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर ही निवडणूक बिनविरोध झाली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार पुणे महापालिकेत सकाळी सव्वा अकरा वाजता महापौर आणि उपमहापौर निवडीच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. यावेळी भाजपचे गटनेते गणेश बिडकर यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे ही निवडणूक बिनविरोध करण्याची विनंती काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते यांना केली.

दरम्यान, साडे अकरा वाजण्याच्या सुमारास उमपहौर पदाच्या निवडीसाठीची प्रक्रिया सुरू झाली. **(पान २ वर)**

# जयश्री सोनकांबळे महापौर, तर स्नेहल उटगे उपमहापौरपदी बिनविरोध निवड



**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर/प्रतिनिधी : लातूर शहर महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर निवडीचा पेच अखेर सुटला असून, काँग्रेसच्या जयश्री सोनकांबळे यांची महापौरपदी, तर ॲड. स्नेहल उटगे यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड झाली आहे. वंचित बहुजन आघाडीने शेवटच्या क्षणी आपले उमेदवार मागे घेतल्याने या निवडीचा मार्ग मोकळा झाला.

सोमवारी सकाळी ११ वाजता महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली. पीठासन अधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी ही निवडणूक प्रक्रिया पार पाडली. सुरुवातीला काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांच्यात सत्तेच्या वाटपावरून पेच निर्माण झाला होता. मात्र, चचेअंती तो यशस्वीरीत्या सोडवण्यात आला.

निवडणूक पूर्व आघाडीनुसार काँग्रेसचे ४३ आणि वंचित बहुजन आघाडीचे ४ उमेदवार निवडून आल्याने या युतीचे सभागृहात स्पष्ट बहुमत होते. मात्र, सत्तेत योग्य वाटा मिळावा, यासाठी वंचितने सुरुवातीला उमेदवारी अर्ज दाखल केले होते. समझोता पुढील अडीच वर्षांच्या टर्ममध्ये उपमहापौरपद वंचित बहुजन आघाडीला देण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर, वचितने आपले अर्ज मागे घेतले. यामुळे महापौर आणि उपमहापौर या दोन्ही पदांच्या निवडी बिनविरोध पार पडल्या. निवडीची अधिकृत घोषणा होताच सभागृहात टाळ्यांच्या कडकडाटात नूतन पदाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. अभिनंदनाचा ठराव मंजूर झाल्यानंतर जयश्री सोनकांबळे आणि ॲड. स्नेहल उटगे यांनी अधिकृतपणे आपला पदभार स्वीकारला. यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष ॲड. किरण जाधव आणि वंचितचे मराठवाडा सचिव संतोष सूर्यवंशी यांनी आघाडी कायम असल्याची अधिकृत घोषणा केली.

# लातूर जिल्हा परिषदेत कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत नाही!

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर, दि.९ - मिनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लातूर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचा सोमवारी निकाल जाहीर झाला असून मतदारांनी कोणत्याही राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत न देता सर्वांनाच बुचकळ्यात टाकले आहे. एकूण ५९ जागा असलेल्या या जिल्हा परिषदेत काँग्रेस सर्वाधिक २३ जागा मिळवणारा पक्ष ठरला आहे. गतवेळेपेक्षा यावेळी भाजपची अर्धी संख्या घटली असून भाजपला १८ ठिकाणी तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा १२ ठिकाणी विजय मिळाला आहे. तर ठाकरे सेना, शिंदे सेना, शरद पवारांची राष्ट्रवादी आणि मनसेला प्रत्येकी एक तर अपक्षांना २ ठिकाणी यश मिळाले आहे.

लातूर तालुक्यातील एकूण १० जिल्हा परिषद गटांपैकी काँग्रेसला ८, भाजपला १, तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला १ जागा मिळाली आहे. औसा तालुक्यातील ९ जागांपैकी काँग्रेसने ४ ठिकाणी यश मिळविले आहे. ठाकरे सेनेला एका ठिकाणी तर भाजपला ४ ठिकाणी यश मिळाले आहे. निलंगा तालुक्यात एकूण १० पैकी ४ ठिकाणी भाजप, ३ ठिकाणी काँग्रेस, एका ठिकाणी अपक्ष, एका ठिकाणी अजित पवारांची राष्ट्रवादी व एका जागेवर शिंदे सेनेला विजय मिळाला आहे. देवणी तालुक्यात ३ पैकी एका जागेवर काँग्रेस तर दोन जागेवर भाजप विजयी झाली आहे. उदगीर तालुक्यात ७ जिल्हा परिषद गट असून तिथे काँग्रेसला केवळ २ जागेवर समाधान मानावे लागले आहे. भाजप २ ठिकाणी तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला ३ ठिकाणी यश मिळाले आहे. ३ जागा असलेल्या जळकोट तालुक्यात काँग्रेसला २ आणि अपक्षाला १ जागा मिळाली आहे. इथे भाजप किंवा राष्ट्रवादीला एकही जागा मिळाली नाही. चाकूर तालुक्यात भाजपला १ व अजित पवारांच्या राष्ट्रवादीला ४ जागा मिळाल्या आहेत. अहमदपूर तालुक्यात एकूण ६ जागा आहेत. त्यात शरद पवारांच्या राष्ट्रवादीला १, भाजपला २, अजित पवारांच्या राष्ट्रवादीला २ एवढ्या जागा मिळाल्या आहेत.

लातूर तालुक्यात काँग्रेसने आपला गड शाबूत ठेवला आहे. तालुक्यातील काटगाव या गटातून काँग्रेसच्या अश्विनी दत्तात्रय शिंदे या भाजपच्या पूर्वादेवी नाथसिंह देशमुख यांचा पराभव करून विजयी झाल्या आहेत. हरंगुळ (बु.) गटातून भागिरथी उर्फ उषा शिवानंद पाटील, तांदुळजा गटातून श्रीकांत उर्फ बाळू पंडीतराव माने, पाखरसांगवी गटातून सोनाली रमेश थोरमोटे, महाराणा प्रतापनगर गटातून महादेव प्रभाकर मस्के, आर्वी गटातून जयश्री धनंजय देशमुख हे काँग्रेस उमेदवार विजयी झाले आहेत. काँग्रेसला पूर्व भागातून मात्र धक्का बसला आहे. भातांगळी, बोरी हा भाग लोकनेते दिवंगत विलासराव देशमुख यांच्या राजकारणाची सुरूवात असलेला भाग मानला जातो. भातांगळी या मतदार गटातून भाजपचे महादेव साळुंके हे लातूर बाजार समितीचे व्हाईस चेअरमन सुनील पडीले यांचा प्रचंड मताधिक्क्याने पराभव करून विजयी झाले आहेत. निवळी गटातून काँग्रेसच्या दीपाली प्रदीप आदमाने या भाजपच्या मयुरी श्रीराम आदमाने यांचा पराभव करून विजयी झाल्या आहेत. एकुरगा गटातून काँग्रेसचे दत्तात्रय काकासाहेब टेकाळे हे ८२७० मते घेऊन विजयी झाले आहेत. त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपचे साहेबराव मुळे यांना ५३२१ मते मिळाली आहेत.

शिरूर अनंतपाळ तालुक्यात जिल्हा परिषदेचे केवळ दोनच गट आहेत. या दोन गटांपैकी येरोळ गटातून भाजप व साकोळ मतदार गटातून काँग्रेस उमेदवार विजयी झाला आहे. येरोळ गटातून भाजपच्या तुळसाबाई जगदीप लोंढे यांना **(पान २ वर)**

## पेरले ते उगवले

पाकिस्तानातील मशिदीतील स्फोटाची जबाबदारी घेणारा आयसिस म्हणजे इराक आणि सीरीयातील सुन्नी मुस्लिम गट आहे. त्यांचा उद्देश्य असतो की शियांच्या धार्मिक स्थळांवर हल्ले करायचे आणि त्यांना ठार मारायचे. काही वर्षापूर्वी त्यानी लाखो लोकांवर राज्य केले आणि त्याद्वारे आपली दहशत पसरवली इस्लामाबादमधील एका शिया पंथाच्या दर्ग्यानजीक एका आत्मघातकी मानवी बाँबने स्वतःला उडवले. या स्फोटात ३१ लोक ठार तर १६९ जण जखमी झाले. तरलाई इमामबर्ग येथे हा शक्तीशाली बाँबस्फोट झाला.आता पाकिस्तानने अफगाणिस्तानवर आणि भारतावर या स्फोटाचे खापर फोडले. पाकिस्तानचे म्हणणे आहे, की अफगाणिस्तानच्या दहशतवाद्यांनी स्फोट घडवला पण भारताने त्यांना आर्थिक मदत केली. पाकचा हा कुटील कांगावा आहे हे सहज लक्षात येते. कारण भारत कुणाच्याही देशात ढवळाढवळ करत नाही आणि पाकच्या उलट्या काळजाच्या देशात तो असे उद्योग करण्याची शक्यता जवळपास नाही. अद्याप कोणत्याही गटाने स्फोटाची जबाबदारी स्वीकारली नाही. तरीही पाकने अफगाणिस्तान आणि भारतावर या स्फोटाचे खापर फोडले. मुळात पाकने आतापर्यंत दहशतवाद्यांना पोसण्याचे काम केले. तो दहशतवाद्यांचा सरपरस्त आहे. त्यामुळे पाकचे औषध त्यालाच पाजण्यात आले. कारण पाकने आतापर्यंत हेच केले. त्याने निरपराध भारतीय नागरिकांना ठार केले. तेही शेकड्यांनी. २००८ चा बॉम्बहल्ला आणि दहशतवाद्यांचा धूडगूस आणि भारतातील ट्रेनमध्ये घडवलेले स्फोट मालिका अशी कितीतरी उदाहरणे आहे. त्यामुळे पाकवर असा दशहतवादी हल्ला झाला तर त्याबद्दल फारसे वाईट वाटण्याचे काही कारण नाही.

पाकला सुसाईड बाँबहल्ले नवे नाही. तीन महिन्यांपूर्वी इस्लामाबाद येथे अशाच एका सुसाईड बाँबरने हल्ला केला होता. या हल्ल्याचा पाकचे अध्यक्ष आणि पंतप्रधान यांनी निषेध केला. पण त्यात काही अर्थ नाही. कारण आतापर्यंत पाकने जे पेरले तेच उगवले. त्यातही पाकचा खोटारडेपणा असा, की भारतावर आरोप करताना पाक हे विसरला, की भारत दुसऱ्या देशात असे उद्योग करत नसतो. हे पाकचे काम आहे. पाकिस्तानचा मित्र म्हणून चीनने या हल्ल्याचा निषेध केला. कोणताही हल्ला होणे आणि त्यात निरपराध नागरिकांचे बळी जाणे हे नेहमीच वाईट असते. पण पाकने भारतावर पूर्वी असेच हल्ले केलेत. पेहलगाम येथे निरपराध हिंदू कुटुंबियांना पाकच्या दहशतवाद्यांनी वेचून ठार केले. त्यामुळे पाकने आता कितीही व्याख्यान झोडले तरीही पाकचे कृत्य नापाक आहे हे जगापासून लपून राहिलेले नाही. पाकचे गृहमंत्री मोहसिन नकवी यांनी म्हटले, की भारताने अफगाणिस्तानातील दहशतवाद्यांना पैशाची मदत केली आणि त्यामुळेच हा हल्ला झाला. पण त्यांनी कोणतेही पुरावे दिले नाही. मागेही भारतातील हल्ले पाक पुरस्कृत होते. पाकने चीनच्या मदतीने मसूद अझर याला अनेक वर्षे दहशतवादी घोषित करण्यास अडथळे आणले. त्यात चीनने आपला व्हेटो अधिकार वापरून मसूदला दहशतवादी घोषित करू दिले नाही. भारताने कित्येक वेळा पाककडे अझरला आपल्या हवाली करण्याची मागणी केली होती. पण तसे झाले नाही. तोच पाकिस्तान आता भारतावर आरोप करत आहे. खरी वस्तुस्थिती अशी आहे, की आपल्या सामाजिक रचनेला भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाय शोधण्याऐवजी पाकिस्तान भारत किंवा अन्य एखाद्या देशाविरोधात असे कट रचल्याचा आरोप करतात पण त्यात तथ्य नसते. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात शाब्दिक युद्ध सुरु झाले. कारण पाकचा आरोप निराधार आहे. हे भारताच्य संरक्षण मंत्रालयाने स्पष्ट केले असून पाकने स्वतःची सुरक्षा यंत्रणा तपासावी आणि त्यातील कमतरता दूर करावयात असा सल्ला दिला. पाकिस्तानी सरकार आणि मीडिया नेहमीच असे बेजबाबदार आणि हास्यास्पद आरोप कुठल्याही पुराव्याशिवाय करतात आणि हा प्रकार त्यातलाच आहे.

पाक हा नेहमीच भारत तर कधी अफगाणिस्तानवर आरोप करतो. पाकवर मृतांच्या कुटुंबियाना उत्तरे देण्याची जबाबदारी वाढत आहे आणि त्यापासून आपली सुटका करून घेण्यासाठी पाक असे डाव आखतो. इस्लामाबादमधील घटनेने केवळ देशातील प्राणघातक सुरक्षा त्रुटी उघड केल्या नाहीत तर प्रादेशिक तणावही वाढवला आहे. पाकिस्तानने दहशतवाद्यांशी लढण्यात आपण शून्य प्रगती केल्याचे दाखवून दिले. पण इस्लामाबादमधील हल्ल्याने त्यांची ही प्रगती किती नाजूक अवस्थेत आहे हे लक्षात आणून दिले. आता इस्लामिक स्टेटने या भीषण हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आणि २००८ मध्ये झालेल्या मॅरियट हॉटेलच्या बाँबस्फोटानंतर हा हल्ला इस्लामाबादेतील सर्वात भीषण हल्ला असल्याचे म्हटले आहे. पाकने चार संशयितांना अटक केली आहे. पाकिस्तानातील मशिदीतील स्फोटाची जबाबदारी घेणारा आयसिस म्हणजे इराक आणि सीरीयातील सुन्नी मुस्लिम गट आहे. त्यांचा उद्देश्य असतो की शियांच्या धार्मिक स्थळांवर हल्ले करायचे आणि त्यांना ठार मारायचे. काही वर्षापूर्वी त्यानी लाखो लोकांवर राज्य केले आणि त्याद्वारे आपली दहशत पसरवली. हाय प्रोफाईल हल्ले करण्याची त्यांची क्षमता कायम आहे. त्यांची पाळेमुळे सीरियाच नव्हे तर अगदी ऑस्ट्रेलियापर्यंत पसरली आहेत आणि नुकताच त्यांनी त्या देशात भीषण हल्ला घडवून १५ लोकांना ठार केले होते. गेल्या काही वर्षात पाक अफगाणिस्तान सीमेवर वाढत्या दहशतवादाचा सामना करावा लागला असला तरीही राजधानी इस्लामाबादमध्ये असा हल्ला होणे ही क्वचितच घडणारी बाब आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने या हल्ल्याचा निषेध केला असून त्यांनी म्हटले आहे, की युद्ध गुन्ह्यांत याचा समावेश होऊ शकतो. भारताने म्हटले आहे, की पाक स्वतःच्या देशांतील सामाजिक चौकटीतील समस्या सोडवण्याऐवजी इतरांवर म्हणजे भारतावर त्याचा दोष ढकलत आहे हे अत्यंत वाईट आणि अशोभनीय आहे. शिया आणि सुन्नी मुस्लिम यांच्यात पंथीय हिंसाचार आणि वैर सर्वश्रुत आहे. त्यामुळे या शिया दर्ग्यावर हल्ला करण्यात आला आणि आयसिसच्या तत्वानुसार हे योग्य आहे. याचे आणखी एक कारण आहे ते म्हणजे शिया जमात ही आयसिसविरोधात लढण्यासाठी मनुष्यबळ पुरवते आणि हा हल्ला म्हणजे प्रत्युत्तर म्हणून हल्ला होता. राजधानीत आपण दहशतवाद पेरू शकतो आणि आयसिसची क्षमता राजधानीतही हल्ले करण्याची आहे हे दाखवून देण्यासाठी हा हल्ला होता असेही मानण्यात येते.

# परीक्षा शिक्षणाचा उत्सव - चला साजरा करूया

विद्यार्थ्यांच्या जीवनात परीक्षा ही केवळ अभ्यासक्रमाची चाचणी नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याची एक महत्त्वाची प्रक्रिया असते. ज्ञान, स्मरणशक्ती आणि समज यांचे मूल्यमापन करण्याबरोबरच परीक्षा विद्यार्थ्याला शिस्त, सातत्य, वेळेचे नियोजन आणि जबाबदारीची जाणीव शिकवते. आयुष्यात येणाऱ्या स्पर्धा, आव्हाने आणि निर्णयांना सामोरे जाण्याची मानसिक तयारी याच टप्प्यावर होते. त्यामुळे परीक्षा म्हणजे फक्त गुण मिळवण्याचे साधन न राहता, आत्मविश्वास, संयम आणि चिकाटी यांची पहिली कसोटी ठरते. या निर्णायक वळणावर उद्यापासून परीक्षा देत असलेल्या सर्व दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना मनःपूर्वक शुभेच्छा ! तुमचे परिश्रम यशात रूपांतरित होवोत आणि भविष्यासाठी भक्कम पाया घडो.

शैक्षणिक क्षेत्रात गुणवत्तेचे प्रतीक म्हणून ओळखला जाणारा लातूर पॅटर्न आजही देशपातळीवर आपली स्वतंत्र ओळख कायम ठेवून आहे. कठोर अभ्यासक्रम, नियमित सराव, काटेकोर मूल्यमापन आणि विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणारी स्पर्धात्मक वृत्ती यांमुळे येथील विद्यार्थी मोठ्या संख्येने मेडिकल व इंजिनिअरिंगसारख्या अवघड प्रवेश परीक्षांमध्ये यश संपादन करत आहेत. इतर परीक्षांच्या तुलनेत लातूर पॅटर्नमध्ये केवळ पाठांतरावर भर न देता संकल्पनात्मक स्पष्टता, वेळेचे नियोजन आणि सातत्यपूर्ण तयारी यांवर विशेष लक्ष दिले जाते. त्यामुळे येथे घडलेला विद्यार्थी कोणत्याही स्पर्धात्मक परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरा जातो. हीच वैशिष्ट्ये लातूर पॅटर्नला केवळ परीक्षा-केंद्रित न ठेवता गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आदर्श बनवतात, आणि म्हणूनच या शैक्षणिक परंपरेचा गौरव करणे अत्यंत योग्य ठरते.

आजच्या स्पर्धात्मक युगात दहावीबारावीला करिअरचा निर्णायक टप्पा असे लेबल लावले जाते. परिणामी विद्यार्थ्यावर अभ्यासापेक्षा अधिक दबाव शिकतो. पालकांच्या अपेक्षा, समाजाची तुलना, आणि सतत विचारले जाणारे किती टक्के पडतील? हे प्रश्न विद्यार्थ्यांच्या मनावर अनावश्यक ओझे टाकतात. परीक्षेचा उद्देश ज्ञानाची पडताळणी असतो. आत्मविश्वास ढासळवणे नव्हे ही जाणीव समाजाने ठेवणे गरजेचे आहे. यश अपयशाची पहिली ओळख याच टप्प्यावर होते. काही विद्यार्थी उत्तम यश मिळवतात, तर काही अपेक्षेपेक्षा कमी गुणांनी खचतात. पण गुणपत्रिकेतील आकडे क्षमता ठरवत नाहीत ती ठरवते विद्यार्थ्याची जिद्द, चिकाटी आणि पुढे उभे राहण्याची ताकद देतात.

परीक्षेच्या काळात शिक्षकांची भूमिका केवळ अध्यापनापुरती मर्यादित न राहता मार्गदर्शनाची असावी. पालकांनीही परीक्षेला भय न बनवता आव्हान म्हणून स्वीकारायला पाल्याला शिकवले पाहिजे. सतत तुलना करण्याऐवजी प्रोत्साहन दिल्यास त्यांचा आत्मविश्वास बळकट होतो. परीक्षेच्या काळात मानसिक आरोग्य हा दुर्लक्षित पण अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. योग्य झोप, संतुलित आहार, थोडा विरंगुळा आणि सकारात्मक संवादहे यशाइतकेच महत्त्वाचे घटक आहेत. परीक्षेत उत्तम कामगिरीसाठी केवळ बुद्धिमत्ता नव्हे, तर मानसिक स्थैर्यही आवश्यक असते.

परीक्षेची पारदर्शकता आणि विश्वासार्हता अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने बोर्डाने आता सर्व परीक्षा केंद्र कॅमेरे-युक्त केलेली आहेत. हा निर्णय केवळ गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी नसून प्रामाणिकपणे परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वाचा ठरतो. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे परीक्षा प्रक्रियेत शिस्त, नियमपालन आणि समान संधी यांचा समतोल राखला जात आहे. विद्यार्थ्यांनीही या व्यवस्थेकडे भीतीने नव्हे, तर न्याय्य व सुरक्षित परीक्षावातावरणाची खात्री म्हणून पाहिले पाहिजे. कारण परीक्षा केंद्रातील कॅमेरे म्हणजे संशयाची नजर नसून, प्रामाणिक प्रयत्नांना दिलेले संरक्षण आहे.

प्रत्येक परीक्षा केंद्रावर बैठे व फिरते पथक, तसेच उच्चपदस्थ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या नियमित भेटी यांमुळे मागील वर्षीची परीक्षा प्रक्रिया अत्यंत शिस्तबद्ध व यशस्वीरीत्या पार पडली, हे विशेषत्वाने नमूद करावे लागेल. या प्रभावी देखरेखीमुळे गैरप्रकारांना आळा बसला असून, विद्यार्थ्यांना भयमुक्त आणि विश्वासार्ह वातावरणात परीक्षा देण्याची संधी मिळाली. प्रशासन, पर्यवेक्षक आणि परीक्षा यंत्रणा यांच्यातील समन्वयामुळे परीक्षा केवळ नियोजनानुसार पार पडली नाही, तर तिच्या विश्वासार्हतेतही लक्षणीय वाढ झाली. परिणामी, परीक्षा प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये सकारात्मक विश्वास निर्माण झाला असून, ही यशस्वी व्यवस्था पुढील परीक्षांसाठीही दिशादर्शक ठरणारी आहे.

महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतून लातूर शहरात शिक्षणासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी दाखल होत असतात. गुणवत्तापूर्ण अध्यापन, शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरण, सातत्यपूर्ण निकालांची परंपरा आणि स्पर्धा परीक्षांसाठी अनुकूल सुविधा यामुळे लातूर हे विश्वासार्ह शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखले जाते. ग्रामीण-शहरी पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांना समान संधी देत, मार्गदर्शन, अभ्यासक्रमाबरोबरच व्यक्तिमत्त्व विकासावर भर दिला जातो. त्यामुळेच राज्यभरातील पालक आणि विद्यार्थ्यांचा लातूरच्या शिक्षण व्यवस्थेवर ठाम विश्वास निर्माण झाला असून, लातूर हे ज्ञानाचे आणि उज्ज्वल भवितव्याचे केंद्र बनले आहे. लातूर बोर्डाने वेळोवेळी ऑनलाइन बैठकांचे आयोजन करून परीक्षा व्यवस्थापन, शिस्त, पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त व दूरदर्शी सूचना दिल्या आहेत. त्या सूचनांनुसारच विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे जावे, प्रशासनाने ठरवून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करावे आणि कोणत्याही अफवा किंवा गैरसमजांना बळी न पडता आत्मविश्वासाने आपली तयारी सादर करावी. प्रशासन, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील समन्वयामुळेच परीक्षा प्रक्रिया अधिक सुरळीत, विश्वासार्ह आणि यशस्वी ठरेल.

शेवटी, दहावीबारावी ही आयुष्याची अंतिम लढाई नाही, तर पुढील प्रवासाची पहिली पायरी आहे. अपयश आले तरी मार्ग संपत नाही आणि यश आले तरी शिकणे थांबत नाही. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास ठेवावा, पालकांनी विश्वास दाखववावा आणि समाजाने संवेदनशीलता जपावी तरच या परीक्षा खऱ्या अर्थाने शिक्षणाचा उत्सव ठरतील, भीतीचा नव्हे. शेवटी, दहावीबारावी ही आयुष्याची अंतिम लढाई नाही, तर पुढील प्रवासाची पहिली पायरी आहे. अपयश आले तरी मार्ग संपत नाही; आणि यश आले तरी शिकणे थांबत नाही. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास ठेवावा, पालकांनी विश्वास दाखववावा आणि समाजाने संवेदनशीलता जपावीतरच या परीक्षा खऱ्या अर्थाने शिक्षणाचा उत्सव ठरतील, भीतीचा नव्हे. चला हा उत्साव साजरा करूया.

विद्यार्थ्यांनो आभाळ भरून शुभेच्छा !!

– प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे
कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव, लातूर

# जागतिक दर्जाचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे भारतातीलच नाही तर जगातील एक नावाजलेले विद्यापीठ आहे. या विद्यापीठाची स्थापना १० फेब्रुवारी १९४९ रोजी झाली म्हणजे आज हे विद्यापीठाला ७७ वर्ष पूर्ण होऊन ७८ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. डॉ एम आर जयकर हे या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते. स्थापनेनंतर १२ जिल्ह्यांमध्ये उच्च शिक्षणाच्या विविध सुविधा पुरवण्याची जबाबदारी पुणे विद्यापीठावर होती. १९६४ मध्ये कोल्हापूर येथे छत्रपती शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर पुणे, नाशिक, धुळे, जळगाव या जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाचे कार्य सुरू झाले. १९९० साली जळगाव येथे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर पुणे, नगर, नाशिक या जिल्ह्यांसह दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील महाविद्यालये या विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहेत. २०१४ साली या विद्यापीठाचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असा नामविस्तार करण्यात आला. पुण्यातील गणेशखिंड रस्त्यावर पुणे विद्यापीठाचे मुख्य संकुल आहे. विद्यापीठाची मुख्य इमारत पुणेकरांसाठी शैक्षणिक अस्मितेचे प्रतीक आहे. ही इमारत ब्रिटिश गव्हर्नरांच्या पुण्यातील मुक्कामासाठी एकोणिसाव्या शतकात बांधण्यात आली होती. इटालियन शैलीत बांधण्यात आलेली ही इमारत म्हणजे पुण्याला मिळालेला ऐतिहासिक वारसा आहे. विद्यपीठाचा परिसर सुमारे ४९० एकराचा असून त्यात अनेक दुर्मिळ सुंदर आणि अतिशय मनमोहक असे वातावरण लाभले आहे. घनदाट जंगल, शोभिवंत हिरवळ, दुर्मिळ ब्रिटिशकालीन कारंजे व ऐतिहासिक अशी ब्रिटिशकालीन भव्य इमारत यामुळे हा परिसर निसर्गप्रेमी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक यांचे आकर्षण केंद्र राहिला आहे. पुणे विद्यापीठात दुर्मिळ तसेच सावली देणारे मोठे वृक्ष आहेत. या वृक्षांची छाया, सौंदर्य आणि उत्साह निर्माण करणारे वातावरण विद्यार्थ्यांना अभ्यास व संशोधन करण्यास प्रोत्साहित करते. विद्यापीठातून विविध पदव्युत्तर विभाग व प्रशासकीय कार्यालयाचे कामकाज चालते. या विभागातून आज जवळपास ६ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ४२ शैक्षणिक विभाग, १२ आंतरविद्या शाखा व सेवा युनिट, २० अध्यासने, ८ राष्ट्रीय व प्रादेशिक केंद्र आहेत. ६९६ संलग्न महाविद्यालये, २८७ मान्यताप्राप्त व्यवस्थापन संस्था, १२१ मान्यताप्राप्त संशोधनकेंद्र विद्यापीठाशी संलग्न आहेत.

विद्यापीठातील विविध विभागात ६० हुन अधिक देशातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आपल्या विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठातील अभ्यासक्रमाचेही फायदे व्हावेत यासाठी गेल्या काही काळात विद्यापीठाने परदेशातील नामांकित विद्यापीठांसोबत सामंजस्य करार केले आहेत. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ जयकर यांच्या नावाने ओळखले जाणारे जयकर ग्रंथालय केवळ विद्यार्थ्यांनाच नाही तर विद्यापीठाबाहेरील संशोधक व अभ्यासकांनाही खेचून आणते. जयकर ग्रंथालय हे माहिती आणि संदर्भ ग्रंथासाठी भारतातीलच नव्हे तर जगातील जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथालयांपैकी एक आहे. जयकर ग्रंथालयात भारतीय व विदेशी मासिके घेतली जातात तसेच ग्रंथालयात काही नियतकालिके मोफत मिळतात. जयकर ग्रंथालयात ५ लाखांहून अधिक पुस्तके व विविध विषयांवरील मासिके आहेत. अशा सुविधांमुळेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यातीलच नव्हे तर देशातील विद्यार्थ्यांच्या पहिल्या पसंतीचे विद्यापीठ आहे. पुणे विद्यापीठ ज्ञानाची निर्मिती, संरक्षण आणि प्रसारण करणारे जागतिक दर्जाचे विद्यापीठ आहे.

– **श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

### राजमाता जिजामाता संकुलातर्फे प्राचार्या शुभांगी काळे यांचा सत्कार

लातूर : येथील शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या संचालकपदी प्राचार्या शुभांगी विक्रम काळे यांची निवड झाल्याबद्दल राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने सोमवारी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते आमदार विक्रम काळे आणि प्राचार्या शुभांगी काळे यांचा सत्कार करण्यात आला. शिवछत्रपती शिक्षण संस्था आणि राजर्षी शाहू कॉलेजचे नाव शिक्षणातील आगळ्या वेगळ्या पॅटर्नमुळे देशभरात गाजत आहे. मी राजर्षी शाहू महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. आज या संस्थेची संचालक म्हणून मला काम करण्याची संधी मिळाली आहे, ही माझ्यासाठी खूप अभिमानाची बाब आहे, असे सांगून संस्था आणि कॉलेजच्या प्रगतीसाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही प्राचार्या शुभांगी काळे यांनी दिली.

पान १ वरून

### भारत-फ्रान्स...

मॅक्रॉनच्या भारत भेटीदरम्यान या प्रकल्पाला अंतिम स्वरूप दिले जाऊ शकते.

या आर्थिक वर्षात, संरक्षण मंत्रालयासाठी ७.८५ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, जी गेल्या वर्षीपेक्षा १५ टक्के जास्त आहे. ऑपरेशन सिंदूर नंतरच्या या पहिल्या अर्थसंकल्पात कोणत्याही आकस्मिक परिस्थितीला तोंड देण्यासाठी संरक्षण तयारी जलद गतीने वाढवण्यावर आणि सशस्त्र दलांचे आधुनिकीकरण करण्यावर भर देण्यात आला आहे. संरक्षण अर्थसंकल्पासाठी देण्यात आलेली रक्कम एकूण सकल देशांतर्गत उत्पादनाच्या १.९९ टक्के आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, पाकिस्तान आणि बांगलादेशमधील वाढत्या जवळीकतेमुळे भारत संरक्षण क्षेत्रात मोठी गुंतवणूक करत आहे.

या करारानंतर भारताकडे १७६ राफेल विमाने असतील, सशख दलांच्या आधुनिकीकरणासाठी १.८५ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, जी गेल्या वर्षीपेक्षा २४ टक्के जास्त आहे. अर्थसंकल्पात पेन्शनसाठी १.७१ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, जी गेल्या वर्षीच्या १.६० लाख कोटी रुपयपिक्षा जास्त आहे. संशोधन आणि विकासासाठीही १७,२५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, जी गेल्या वर्षीच्या १४.९२३ कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.

### शरद पवारांची....

प्रकृतीचे गांभीर्य ओळखून डॉक्टरांनी त्यांना पुढील उपचारांसाठी पुण्यातील खासगी रुग्णालयात दाखल करण्याचा सल्ला दिला. त्यानंतर तातडीने कार्डियाक म्बुलन्स आणि वैद्यकीय पथकाच्या निगराणीत त्यांना घेऊन सुप्रिया सुळे पुण्याच्या दिशेने निघाल्या आहेत.

### 'संघाने सांगावे...

सरसंघचालक होण्यासाठी ब्राह्मण असणे ही अनिवार्य पात्रता नाही आणि अनुसुचित जाती (एससी) किंवा अनुसूचित जमातीमधील (एसटी) असणे ही अपात्रता नाही, तथापि, सरसंघचालक नेहमीच हिंदू असेल, मग ती कोणत्याही जातीचा असो, जेव्हा संधाची स्थापना झाली तेव्हा त्याची सुरुवात ब्राह्मणबहुल भागात झाली होती, त्यामुळे सुरुवातीच्या काळात बहुतेक पदाधिकारी ब्राह्मण होते. परंतु आता संघाचा विस्तार झाला आहे. पुढील सरसंघचालक कोण असेल याचा निर्णय उपलब्ध सर्वोत्तम उमेदवार' या आधारे घेतला जाईल.

म्हणाले की, भ्रष्टाचार हा व्यवस्थेतील दोष नाही तर मानवी मूल्यांमधील दोष आहे. चाणक्य यांचे उद्धरण देताना ते म्हणाले की, मासा पाणी पितो तेव्हा तो शोधणे जसे कठीण असते, तसेच सरकारी व्यवस्थेतील भ्रष्टाचार शोवणे देखील तितकेच कठीण असते.

'भाषा आणि तंत्रज्ञानाबाबत संघाची भूमिका डॉ. भागवत म्हणाले की, इंग्रजी ही भारतीय भाषा नाही. जिये इंग्रजीशिवाय काम करणे अशक्य आहे तिथे आम्ही तिचा वापर करू शकतो, परंतु संधाचे अंतर्गत काम फक्त भारतीय भाषामध्येच केले जाईल.

एआय वापराबद्दल इशारा डॉ. भागवत यांनी केंद्र सरकारला इशारा दिला की, कृत्रिम बुद्धिमता (एआय) आणि नवीन तंत्रज्ञानाचे स्वागत असले तरी, त्यांचा वापर अशा प्रकारे केला पाहिजे की, रोजगारावर परिणाम होऊ नये, यंत्रांद्वारे उत्पादनऐवजी 'लोकांद्वारे उत्पादन 'वर भर दिला.

### जिल्हा परिषदेत....

यश मिळाले आहे. काँग्रेसने एका ठिकाणी सत्ता मिळवली. मात्र उद्धव उबाठा गटाला जिल्हा परिषदेत खातेही उघडता आलेले नाही.

या पराभवामागे उबाठा गटाच्या वरिष्ठ नेतृत्वाची निष्क्रियता कारणीभूत ठरल्याचे मत व्यक्त केले जात आहे. उबाठाच्या एकाही बड्या नेत्याने या निवडणुकीत सक्रिय प्रचार केला नाही किंवा कार्यकर्त्यांना बळ दिले नाही. याचाच परिणाम निकालात दिसून आल्याचा टोला भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी लगावला आहे.

### लातूरमध्ये 'हात'

माजी मंत्री, आमदार मा. श्री. अमित विलासराव देशमुख, माजी आमदार मा. श्री. धिरज विलासराव देशमुख आणि विलास साखर कारखान्याच्या चेअरमन मा. सौ. वैशाली विलासराव देशमुख यांनी सर्व नवनियुक्त सदस्यांचे पुष्पहार घालून स्वागत केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

स्मृतीस्थळाचे दर्शन:

सर्व विजयी उमेदवारांनी प्रथम लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या स्मृतीस्थळी जाऊन नतमस्तक होऊन अभिवादन केले. 'साहेबांच्या विचारांचा वारसा आणि सर्वसामान्यांच्या विकासाची ही परंपरा अधिक जोमाने पुढे नेऊ,' असा संकल्प यावेळी नवनियुक्त सदस्यांनी व्यक्त केला. या विजयाने जिल्ह्याचा राजकीय नकाशा 'काँग्रेसमय' झाला आहे.

### वळसे पाटील...,

माढा तालुक्यातील मानेगाव गटातून माजी मंत्री तानाजी सावंत यांचे पुतणे पृथ्वीराज सावंत यांनी भाजपच्या तिकिटावर ६ हजार ८०० मतांच्या विक्रमी मताधिक्याने प्रतिस्पर्ध्याचा पराभव केला. याच जिल्ह्यात भाजप नेते राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते यांनी दहिगाव गटातून विजय मिळवत राजकीय क्षेत्रात यशस्वी प्रवेश केला आहे. दुसरीकडे, रायगड जिल्ह्यात आमदार भरत गोगावले यांचे चिरंजीव विकास गोगावले यांनी आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत प्रतिस्पर्धी उमेदवाराचा पराभव केला.

परभणीत घराणेशाही नाकारली:

दरम्यान, परभणी जिल्ह्यात मतदारांनी घराणेशाहीला स्पष्ट नकार दिल्याचे चित्र समोर आले आहे. माजी मंत्री सुरेश वरपुडकर यांना या निवडणुकीत मोठा धक्का बसला असून, त्यांच्या कुटुंबातील पाच उमेदवारांपैकी केवळ एकालाच विजय मिळवता आला आहे. वरपुडकर यांचा मुलगा, मुलगी, सून आणि एक पुतणा या चौघांना पराभवाला सामोरे जावे लागले असून, या निकालाने जिल्ह्यात राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

### पुण्यात महापौर...

काँग्रेसकडून साहिल केदारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून दत्ता बहिरट, तर भाजपकडून परशुराम वाडेकर यांचे अर्ज वैध ठरले. त्यानंतर बहिरट व केदारी यांनी उपमहापौर पदाच्या निवडणुकीतून माघार घेतली. त्यामुळे उपमहापौर पदी भाजप रिपब्लिकन पक्षाचे (आठवले गट) परशुराम वाडेकर यांची बिनविरोध निवड झाली. त्यानंतर वाडेकर यांची उपमहापौर म्हणून निवड करण्यात आली.

केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी नागपुरे व वाडेकर यांची सभागृहात उपस्थित राहून अभिनंदन केले.

### लातूर जिल्हा...

७३१२, काँग्रेसच्या शीतल रमेश सोनवणे यांना ६३०२ तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या शीतल धर्माजी सोनवकवडे यांना ४२९२ मते मिळाली आहेत. साकोळ गटातून काँग्रेसचे दौलतराव गायकवाड हे ८४९३ मते घेऊन विजयी झाले आहेत. त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपचे विठ्ठल गुलाब वाघमारे यांना ७८८६ तर वंचित बहुजन आघाडीचे प्रमोद विश्वंभर सूर्यवंशी यांना १४२८ मते मिळाली आहेत. केवळ चार सदस्य असलेल्या शिरूर अनंतपाळ पंचायत समितीत भाजपचे २ सदस्य तर राष्ट्रवादी १ आणि १ शिवसेनेचा उमेदवार निवडून आला आहे. येरोळ गणातून राष्ट्रवादीच्या पूनम खंडेराव चव्हाण यांनी ३८३२ मते मिळवून विजय मिळविला आहे. या गणात काँग्रेसच्या अहिल्या प्रभाकर बंडगर यांना २८०१ तर भाजपच्या पुष्पमाला धनंजय मठपती यांना २८३१ मते मिळाली. हिप्पळगाव मतदार गटातून भाजपचे संजय हरिश्चंद्र सूर्यवंशी हे विजयी झाले आहेत. साकोळ गणातून भाजपच्या मीना तुकाराम लांडगे तर हिसामाबाद उजेड गणातून हमीद गोरेमिया सय्यद हे शिवसेनेचे उमेदवार विजयी झाले आहेत.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिंग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

# तेर गटातील चुरशीच्या लढतीत अर्चना पाटील यांचा दणदणीत विजय

धाराशिव : प्रतिनिधी- धाराशिव जिल्हयातील मतमोजणीला सोमवारी सकाळी सुरुवात झाली. याठिकाणी धाराशिव तालुक्यातील तेर गटात चुरशीची लढत झाली. याठिकाणी भाजप आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील या २३६० मतांनी विजयी झाल्या आहेत. त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या उमेदवार किर्तीमाला खटावकर यांचा पराभव केला. याठिकाणी तिरंगी झालेल्या तिरंगी लढतीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या उमेदवार सक्षणा सलगर या तिस-या स्थानावर राहिल्या आहेत.

धाराशिव जिल्ह्यातील ५५ जिल्हा परिषदेच्या गटासाठी ११० पंचायत समितीच्या गणासाठी शनिवारी मतदान पार पडले. त्यामुळे राज्यातील वातावरण ढवळून निघाले होते. सोमवारी सकाळी मतमोजणी सुरु झाली असून त्यामध्ये अनेक धक्कादायक निकाल समोर येत आहेत.

धाराशिव तालुक्यातील तेर गटात चुरशीच्या लढतीकडे



सर्वांचे लक्ष लागले होते. याठिकाणी भाजप आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील या विजयी झाल्या. भाजपच्या उमेदवार अर्चना पाटील या दोन ३६० मतांनी विजयी झाल्या आहेत. पाटील यांना ७ हजार ५९७ मते मिळाली तर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या उमेदवार कीर्तिमाला खटावकर यांना ५ हजार २३७ मते मिळाली तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या उमेदवार सक्षणा सलगर यांना १ हजार २५३ मते मिळाली.

विशेष म्हणजे यापूर्वी लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून निवडणूक रिंगणात उतरलेल्या अर्चना पाटील पराभूत झाल्या होत्या. मात्र तेर गटातील या लढतीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. त्यामध्ये अर्चना पाटील यांनी बाजी मारली. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या उमेदवार सक्षणा सलगर या तिस-या स्थानावर राहिल्या आहेत. दरम्यान, धाराशिव जिल्ह्यातील या निवडणुकीत जिल्ह्याची सत्ता काबीज करण्यासाठी भाजप आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यात पुन्हा एकदा संघर्ष या निवडणुकीच्या निमित्ताने पाहायला मिळाला.

# माता रमाईचा आदर्श समोर ठेवून महिलांनी आपली मुले घडवावीत : कार्यक्रमाधिकारी राहुल आत्राम

## जवळा येथे त्यागमूर्ती माता रमाई यांची १२८ वी जयंती उत्साहात साजरी



लोहा - त्यागमूर्ती माता रमाईचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून महिलांनी आपली मुले घडवावीत असे प्रतिपादन नांदेड आकाशवाणी केंद्राचे कार्यक्रमाधिकारी राहुल आत्राम यांनी माता रमाई यांच्या १२८ व्या जयंती कार्यक्रमामध्ये अध्यक्ष पदावरून बोलताना केले. लोहा तालुक्यातील जवळा येथे त्याग, सहनशीलता, समता आणि समाजसेवेचे प्रतीक असलेल्या त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांची जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विचार मंचवार प्रमुख पाहुणे म्हणून सोनखेड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने, माता रमाई जयती मंडळाच्या अध्यक्षा भारतबाई निखाते, उपाध्यक्षा करुणाबाई गच्चे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक सुभाष खाडे, ख्यातनाम पत्रकार राजेश्वर कांबळे, जवळा (दे) चे पोलीस पाटील नितीन गवळी, माजी सरपंच साहेब शिखरे,माजी ग्रामपंचायत सदस्य प्रल्हाद मोरे, सामाजिक कार्यकर्ते अंकुश शिखरे आदींची उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

पुढे बोलताना राहुल आत्राम म्हणाले की, माता रमाई यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही समाजहिताचा विचार कधीच सोडला नाही. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक लढ्याला मोलाची साथ दिली. त्यांचा त्याग, संयम आणि कर्तव्यनिष्ठा आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. सुशिक्षित व सुसंस्कृत पिढी घडवण्यात महिलांची भूमिका निर्णायक आहे समाजातील महिलांनी आत्मनिर्भर व्हावे, शिक्षणाला प्राधान्य द्यावे आणि सामाजिक परिवर्तनात सक्रिय सहभाग घ्यावा, स्त्रीसक्षमीकरण, शिक्षणाचे महत्त्व आणि सामाजिक समतेचा संदेश या माध्यमातून कार्यक्रमाधिकारी आत्राम यांनी दिला.

कार्क्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार भैय्यासाहेब गोडबोले यांनी केले, प्रास्ताविक आकाशवाणीचे प्रासंगिक उदघोषक आनंद गोडबोले तर सर्वांचे आभार सुरेश गोडबोले यांनी मानले. या कार्यक्रमास ग्रामस्थ, महिला, युवक, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुपारी ४ वाजता माता रमाई यांच्या भव्य तैल चित्राची मिरवणूक जवळा गावातील मुख्य रस्त्याने काढण्यात आली. या कार्यक्रमाला गावातील महिला, पुरुष, युवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी कैलास गोडबोले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती मंडळाचे अध्यक्ष भीमराव गोडबोले, भारतीय बौद्ध महासभेचे शाखाध्यक्ष सुरेश गोडबोले, मिलिंद गोडबोले, प्रकाश गोडबोले, शंकर,गच्चे, किशन गच्चे, किशन गोडबोले, मुकुंद गोडबोले, विलास गोडबोले, वसंत हिंगोले, वच्छलाबाई गोडबोले, सुंदरबाई गोडबोल, माया गोडबोले, दत्ता गोडबोले, अन्नाराव गच्चे, मारोती गोडबोले, चांदु झिंझाडे, भीमराव हिरामण गोडबोले, अरविंद गोडबोले, अतुल गोडबोले, बालचंद गोडबोले,भीमराव लोखंडे, तुकाराम कांबळे, गणेश कांबळे, संजय कांबळे, राजेश गच्चे,रमेश गोडबोले, समता सैनिक दलाचे गुणवंत गच्चे, साहेब गच्चे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

### माता रमाई गणगोत पुरस्काराचे थाटात वितरण

दरवर्षी जवळा ग्रामस्थाच्यावतीने ७ मातांना मातांना रमाई गणगोत पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते या वर्षीही पूज्य भंते बौद्धीधम्मो यांच्या आई सरस्वतीबाई पोवळे (वसरणी, नांदेड), ख्यातनाम पत्रकार राजेश्वर कांबळे यांची आई निर्मलाबाई कांबळे (कंधार), सुनिता डोंगरे (उमरी), सुकांता वागरे, समता सैनिक दैवशाला मस्के (माळाकोळी), लक्ष्मीबाई जमराज (पिंपरण), जिजाबाई गोडबोले (बळीरामपूर, नांदेड) या मातांना माता रमाई गणगोत पुरस्कार देऊन मान्यरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

### भारतीय संविधानाचे अंकुश शिखरे यांच्याकडून वाटप

भारतीय संविधानाची ओळख सर्वसामान्य जनतेला व्हावी आणि घराघरात संविधान वाचले जावे म्हणून ' हरघर संविधान, घरघर संविधान या उपक्रमांतर्गत सामाजिक कार्यकर्ते अंकुश शिखरे यांनी या कार्यक्रमामध्ये उपस्थित महिला - पुरुष, युवकांना भारतीय संविधानाच्या शेकडो प्रतीचे वाटप करुन हे संविधान घेवून घरी ठेवू नका तर प्रत्येकाने वाचा असा त्यांनी अग्रह केला.

# राज्यातून थंडी होतेय गायब

मुंबई : प्रतिनिधी- गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या तापमानात कमालीचा चढ उतार पाहायला मिळत आहे. त्यामुळे दिवसा उन्हाचे चटके आणि रात्रीचा काहीसा गारवा असा अनुभव राज्यभरातील अनेक भागातील नागरिकांना येत आहे. त्यामुळे हिवाळा अजून संपला नसला तरी उन्हाळ्याच्या दिशेने तापमानाची वाटचाल सुरू झाल्याचे आता पाहायला मिळत आहे. मुंबईत आधीच दमट हवामान असताना दुपारी १२ वाजेनंतर कडक ऊन आणि रात्री १० वाजेनंतर गारव्याचा अनुभव मुंबईकरांना येत आहे.

उत्तर भारतात कडाक्याची थंडी पडली असून झालेल्या बर्फवृष्टीमुळे याचा इतर राज्यातील हवामानावर मोठा परिणाम झाल्याचे पाहायला मिळत आहे. तर, येत्या काही दिवसांमध्ये राज्यातील तापमान वाढण्याची शक्यता हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

सध्या राज्यात अनेक भागात कोरडे वारे वाहत आहेत. यामुळे गरम हवेच्या खालच्या थरात थंड हवा अडकून पडल्यासारखे जाणवत आहे. यामुळे तापमान वाढले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, येत्या काही दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. यामुळे नागरिकांना उष्णतेचा सामना करावा लागू शकतो. साधारणपणे १० ते १२ फेब्रुवारीनंतर हिवाळा आणि उन्हाळा या दरम्यानचा वारे बदलाचा काळ सुरू होऊ शकतो. मात्र, यावर्षी हा काळ लवकर सुरू होण्याची चिन्हे दिसत आहेत, अशी माहिती हवामान तज्ज्ञांकडून देण्यात आली आहे. मुंबईत सकाळी धुरकट वातावरण तर दुपारी आकाश निरभ्र असेल. कमाल तापमान ३५ अंशांच्या आसपास राहण्याची शक्यता असल्याने उन्हाचा चटकाही जाणवणार आहे.

# इतिहास घडला : औसा पंचायत समितीवर प्रथमच भाजपाचा झेंडा, काँग्रेसचा बालेकिल्ला उद्ध्वस्त

## भाजप ११, काँग्रेस ४, उबाठा १, अपक्ष १

औसा- औसा तालुक्याच्या राजकीय इतिहासात आज एक नवा अध्याय लिहिला गेला असून पंचायत समिती निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने ऐतिहासिक विजय मिळवला आहे. औसा तालुक्यातील एकूण १८ पंचायत समिती गणांसाठी झालेल्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून यामध्ये भाजपाने ११ गणांवर थेट विजय मिळवला आहे, तर एका गणात अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे. गणांवर भाजपाचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. या विजयासह औसा पंचायत समितीवर प्रथमच भाजपाचा झेंडा फडकला असून अनेक वर्षांपासून काँग्रेसच्या ताब्यात असलेली पंचायत समिती भाजपाने हिसकावून घेतली आहे.

या निवडणुकीत भाजपाने प्रभावी रणनीती, संघटनशक्ती आणि स्थानिक नेतृत्वाच्या जोरावर काँग्रेसचा बालेकिल्ला ढासळवला. औसा पंचायत समिती यापूर्वी काँग्रेसच्या ताब्यात होती, मात्र यावेळी जनतेने बदलाचा कौल देत भाजपाला स्पष्ट बहुमत दिले. या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत आमदार अभिमन्यू पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाने एकसंध आणि आक्रमक प्रचार केला. मतदारांशी थेट संवाद, विकासाचे मुद्दे आणि संघटनात्मक ताकद याचा प्रभाव निवडणूक निकालात स्पष्टपणे दिसून आला.औसा पंचायत समिती मध्ये आशीव -समाधान अर्जुन कांबळे, तुंगी - परमेश्वर श्रीमंत लांडगे , नांदुर्गा- अमोल साहेबराव पाटील , उजनी - शिवराज काशिनाथ राठोड , शिवली - प्रणिता राजकिरण साठी , बोरफळ - भाग्यश्री कृष्णा साळुंखे , हासेगाव - विलास शिवाजी साळुंखे , आलमला- गंगाबाई माणिक कोदळीकर , याकतपूर- बालिका सदाशिव स्वामी , कारला- राम दीपक बिराजदार , नागरसोगा- सुकेशनी श्रीधर जाधव, याठिकाणी भाजप उमेदवार विजयी झाले आहेत.तर किल्लारी गण याठिकाणी अपक्ष उमेदवार जयपाल भोसले विजयी झाले आहेत.तर काँग्रेसचे तळणी- अभिजीत देशमुख, खरोसा- शितल विष्णू फावडे,भादा- किशोर जावंजाळे,मातोळा - वैशाली घोडके,तसेच उबाठा कडून लोदगा - पंचाफुलाबाई घोडके निवडणूक प्रचारादरम्यान भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, माजी आमदार दिनकर माने तसेच माजी आमदार पाशा पटेल यांनी तालुक्यात प्रचार सभा घेऊन कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण केला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळे हा ऐतिहासिक विजय शक्य झाला असल्याचे बोलले जात आहे.या निकालानंतर औसा तालुक्यात भाजप कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला असून नागरिकांमध्येही नव्या सत्तेकडून विकासाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. औसा पंचायत समितीवर भाजपाची सत्ता स्थापन होणे हे केवळ पक्षासाठीच नव्हे तर तालुक्याच्या राजकारणासाठीही एक महत्त्वपूर्ण वळण मानले जात आहे.

# प्रभावी संवाद कौशल्य व्यक्तिमत्व विकासाची गुरुकिल्ली: डॉ धनंजय गायकवाड




लातूर (प्रतिनिधी) शिव छत्रपती शिक्षण संस्था संचालित, राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर,(अधिकार प्रदत्त स्वायत्त) प्रशिक्षण व रोजगार कक्ष यांच्यावतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने एक दिवसीय व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. सदरील कार्यशाळा प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (पीएम उषा) अंतर्गत आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ख्यातनाम सॉफ्ट स्किल प्रशिक्षक तथा मैत्री फाऊंडेशनचे संचालक डॉ. धनंजय गायकवाड उपस्थित होते. कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना प्रशिक्षण व रोजगार कक्षाचे प्रमुख डॉ. निशांक पिंपळे यांनी आजच्या अत्यंत स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक उत्कृष्टता पुरेशी ठरत नाही, यशस्वी करिअर घडविण्यासाठी व्यक्तिमत्त्व विकास, प्रभावी संवाद कौशल्ये, आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि सकारात्मक दृष्टिकोन हे घटक अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात असे सांगितले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. धनंजय गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकासाचे विविध पैलू अत्यंत प्रभावी व प्रेरणादायी पद्धतीने समजावून सांगितले. ज्ञान व वेळेचा आदर करा तसेच प्रभावी संवाद कौशल्य विविध भाषेमध्ये संपादन करावे या माध्यमातून रोजगाराच्या विविध संधी सहज उपलब्ध होतात. संवाद कला ही यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे यांनी योग्य नियोजन, शिस्तबद्ध जीवनशैली आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांमुळे शैक्षणिक तसेच व्यावसायिक क्षेत्रात प्रगती साधता येते, असे मत नमूद केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. श्रद्धा जोशी तर आभार प्रदर्शन प्रा. सुनीता जाधव यांनी केले. सदरील कार्यशाळेमध्ये संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान विभागातील टडळिवर्शी इन्क्युबेशन प्लेसमेंट इंटिग्रेटेड बूट कॅम्प कार्यक्रमाअंतर्गत निवड झालेल्या ३७ विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

सदरील कार्यशाळा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, परीक्षा नियंत्रक डॉ. ओमप्रकाश शहापूरकर, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. अभिजीत यादव, विज्ञान पदव्युत्तर विभागाचे मुख्य समन्वयक डॉ. धनंजय पालके, प्रशिक्षण व रोजगार कक्षाचे प्रमुख डॉ. निशांक पिंपळे तसेच रोजगार व प्रशिक्षण कक्षातील सर्व समन्वयक यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तिमत्त्व विकास, करिअर सज्जता व रोजगारक्षम कौशल्यांबाबत सकारात्मक जागरूकता निर्माण झाली असे मत विद्यार्थ्यांनी व आयोजकांनी व्यक्त केले.

# गुलाबी थंडीतही फुलला विद्रोहाचा अंगार

## रमाई जयंतीनिमित्त रंगले कविसंमेलन; एक मूठ धान्य एक रुपया देण्याचे आवाहन

नांदेड- येत्या २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी शहरात होणाऱ्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर एक मूठ धान्य एक रुपया मोहिमेचा प्रचार करण्याच्या आणि अधिकाधिक लोकसहभाग वाढविण्यासाठी विद्रोही कविसंमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. माता रमाई जयंतीचे औचित्य साधून शहरातील सहयोगनगरस्थित माता रमाई आंबेडकर बुद्ध विहारात पहिल्या विद्रोही कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. गुलाबी थंडीतही कवी कवयित्रींनी विद्रोहाचा अंगार फुलविला. या कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अनंत राऊत तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आदिनाथ इंगोले, डॉ. विलासराज भद्रे, डॉ.




भीमराव हाटकर, दिगंबर घायाळे, विमल शेंडे, दत्ता तुमवाड यांची उपस्थिती होती.

कविसंमेलनाच्या प्रारंभी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी झालेल्या कविसंमेलनात दिगंबर घायाळे, इंजि. डॉ. विवेक मवाडे, क्रांतीकुमार पंडित, गयाताई कोकरे, जयाताई सूर्यवंशी, विमल शेंडे, अनुरत्न वाघमारे, थोरात बंधू, उज्वला पडलवार, प्रा. प्रल्हाद इंगोले, सदानंद सपकाळे, प्रज्ञाधर ढवळे, राहुल वाडे, मारोती कदम, डॉ. आदिनाथ इंगोले, नागोराव डोंगरे, दत्ता तुमवाड, इंजि. डॉ. भीमराव हाटकर, डॉ. विलासराज भद्रे, डी. एन. मोरे खैरकेकर, प्रफुल्ल कौडगावकर यांनी सहभाग नोंदविला. कविसंमेलनाचे सूत्रसंचालन डॉ. विलासराज भद्रे आणि डॉ. भीमराव हाटकर यांनी केले. प्रास्ताविक व आभार प्रदर्शन सदानंद सपकाळे यांनी केले. अध्यक्षीय समारोप डॉ. अनंत राऊत यांनी केला.

'एक मूठ धान्य एक रुपया' देण्याचे आवाहन कविसंमेलनादरम्यान मान्यवरांनी विद्रोही साठी 'एक मूठ धान्य आणि एक रुपया' देण्याची मोहीम शहरातील विविध भागात जोर धरत आहे. सहयोग नगर परिसरातील बौद्ध उपासक उपासक उपासिकांना दान देण्यासाठी सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले. कवी कवयित्रींनी एकापेक्षा एक विद्रोही कविता सादर करून कविसंमेलनात रंगत भरली. यावेळी परिसरातील रसिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. कविसंमेलनाच्या यशस्वितेसाठी माता रमाई आंबेडकर बुद्ध विहार समितीने परिश्रम घेतले.

# नवनिर्माण व्याख्यानमालेचे आयोजन

लातूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे व नवनिर्माण प्रतिष्ठान, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक प.पू. श्री गोळवलकर गुरुजी यांच्या जन्मदिनानिमित्त दि.११ ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्रतिवर्षाप्रमाणे नवनिर्माण व्याख्यानमालेचे आयोजन दयानंद सभागृहात संध्याकाळी सहा वाजता करण्यात आले आहे.

सन २०२५-२६ या वर्षात वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापन दिन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेचे शताब्दी वर्ष व पंडित दीनदयालजी उपाध्याय यांनी समाज उन्नतीसाठी मांडलेले एकात्म मानव दर्शन या सिद्धांताचे हीरक महोत्सवी वर्ष अशा विचारांच्या त्रिवेणी संगमाचा योग लक्षात घेऊन ही व्याख्यानमाला आयोजित केली आहे. या व्याख्यानमालेत दि. ११ फेब्रुवारी बुधवार रोजी नाशिकच्या स्वामी विवेकानंद केंद्राचे सहसंचालक प्रकाश पाठक यांचे एकात्म मानव दर्शन या विषयावर, दि. १२ फेब्रुवारी रोजी परभणीच्या मराठवाडा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अनंतराव पांडे यांचे पंचपरिवर्तनातून सामर्थ्यशाली समाज व वैभवशाली राष्ट्र निर्मिती तर दि.१३ फेब्रुवारी रोजी पुणे येथील आदित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष विद्यावाचस्पती गुरुदेव शंकरराव अभ्यंकर यांचे वंदे मातरम राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापन दिन या विषयावर व्याख्यान होणार आहे. या व्याख्यानमालेस प्रमुख अतिथी म्हणून अनुक्रमे भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष सुशील दादा वाजपेयी, अष्टांग योग केंद्राचे संचालक योगाचार्य दिलीपराव भातलवंडे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरेचे माजी कुलगुरू कर्नल डॉ. कारभारी काळे यांची उपस्थिती राहणार आहे.

या व्याख्यानमालेचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन नवनिर्माण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, उपाध्यक्ष महेंद्र जोशी, कार्यवाह अशोक शिवणे, कोषाध्यक्ष उमेश कुलकर्णी तसेच कार्यकारिणी सदस्य सुधीर धुत्तेकर, शैलेश कुलकर्णी, धनंजय पटवारी, संजय गुरव, प्राजक्ता सरदेशमुख, ड. प्रणाली रायचूरकर, व्यंकटेश कुलकर्णी, चंद्रकांत कुलकर्णी, उमेश सेलूकर, किशोर कुलकर्णी यांनी केले आहे.

# व्यक्त होता आलं की व्यक्तिमत्व घडत जातं : गझलकार डॉ. मुकुंद राजपंखे

## बाभळगाव महाविद्यालयात स्नेहसंमेलनाचे थाटात उद्घाटन

दै. अदिती एक्सप्रेस

बाभळगाव : मोठी माणसंही कधी काळी आपल्या वयाची होती.तेंव्हा ते काय करत होते आणि नंतर त्यांनी काय केलं, याचा एक भला मोठा अशय आपल्या समोर येतो. मोठी माणसं अशीच कशी मोठी होतील बरं.कांही तरी जगावेगळं आणि जगासाठी करत राहिली असणार ती माणसं.पुस्तकं त्यांचा परिचय करुन देतात.तेंव्हा पुस्तकं वाचा लेकरंहो. पुस्तकं आणि पुस्तकातली माणसं. आपल्याला छत्रपती शिवजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे आणि आजच्याच काळातली उदाहरणं द्यायची झाली तर आपल्याच परिसरात नायक म्हणून ज्यांच्याकडं पहावं असे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. गोपिनाथराव मुंडे साहेब यांचा तरुणाईतला संघर्षाचा काळ मोठा क्रांतीकारी होता. तेव्हा, लेकरो हो ! यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवा. व्यक्त व्हायला शिका, त्या शिवाय व्यक्तिमत्व घडंत नाही ! असे प्रतिपादन प्रसिद्ध गझलकार डॉ. मुकुंद राजपंखे यांनी केले.

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे विद्यार्थी परिषद उद्घाटन, वार्षिक बक्षीस वितरण आणि स्नेहसंमेलन उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून गझलकार राजपंखे बोलत होते. प्रारंभी लोकनेते विलासरावजी देशमुख साहेब यांच्या प्रतिमेस



अभिवादन आणि दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते. प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने उपस्थित होते.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या विचारशील लेखन, सर्जनशीलता व सामाजिक जाणिवेचे दर्शन घडविणारे हे भित्तीपत्रक उपस्थितांचे विशेष आकर्षण ठरले. शैक्षणिक उपक्रमांना चालना देणाऱ्या या उपक्रमाबद्दल मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संचालक माने म्हणाले, शिक्षणाबरोबरच क्रीडा ही शिस्त, संघभावना, नेतृत्वगुण व जिद्द निर्माण करणारी प्रभावी माध्यमे आहेत. बाभळगाव महाविद्यालयातील क्रीडा विभागाने अल्पकालावधीत विविध स्पर्धांमध्ये मिळवलेले यश, नियमित सराव व शिस्तबद्ध नियोजन याबद्दल विद्यापीठ स्तरावर त्यांचे कौतुक होत असते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना क्रीडेत संधी देऊन त्यांना राज्य व विद्यापीठ स्तरावर पोहोचवण्याचे कार्य प्रेरणादायी आहे. त्या महाविद्यालयातून घडते यावेळी संस्थेचे कोषाध्यक्ष आयुब शेख, माजी विद्यार्थी समिती अध्यक्ष अॅड. व्यंकट नाईकवाडे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

मंचावर संस्थेचे संचालक मारोती मस्के, क्रीडा संचालक डॉ.वैशाली माढेकर, शिक्षकेत्तर कर्मचारी सचिव बाळासाहेब देशमुख, विद्यार्थी पालक संपर्क समिती प्रमुख डॉ. अभिजीत बादाडे, प्रा. ज्ञानदेव कांबळे, प्रा. शिल्पा हलसीकर, विद्यार्थी परिषद सचिव कृष्णा धामणगावे, सहसचिव पूजा सवारे यांची उपस्थिती होती. विद्यार्थी परिषद प्रभारी डॉ. दशरथ भिसे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जयदेवी पवार, बक्षीस वितरण डॉ. मा.ना. गायकवाड आणि डॉ. नाना जाधव यांनी केले तर आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पांडूरंग मुंढे यांनी मानले.

वार्षिक बक्षीस वितरणासह शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले. दुपारच्या सत्रामध्ये स्नेहसंमेलनानिमित्त विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक, शेलापागोटे वाचन कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. त्यामध्ये सांस्कृतिक विभाग सल्लागार समितीसह डॉ. रणजीत जाधव, डॉ. शाहूराज मुळे, ग्रंथपाल डॉ. महावीर कटके, प्रा.महारुद्र बिडवे, प्रा. संतोष कल्याणकर, प्रा. शितल खोत, विठ्ठल मुळे यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.नरेंद्र देशमुख, डॉ. अजित भांजी, डॉ. सुरेशकुमार कांबळे, डॉ. अंगत कोते, प्रा. विवेक कदम, प्रा.सोपान डोपे, प्रा. विवेक जाधव, प्रा. विवेक गोस्वामी, प्रा. संदिपान चवले, प्रा. नंदा खरटमल, प्रा. बालिका गौंड, प्रा.अंकिता वाडकर, राजकुमार कांबळे, हनुमंत शिंदे, प्रकाश मेहरकर, माजी विद्यार्थी ओंकार सुरवसे, अंकुश थडकर, दत्ता फुलगामे, नितीन पाटील आणि बालाजी देशमुख यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# मूलभूत आणि उपयोजित विज्ञान संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर - डॉ.शेषनाथ भोसले

दै. अदिती एक्सप्रेस

उदगीर –क्वांटम कॉम्प्युटिंग, जैवतंत्रज्ञान, शाश्वत ऊर्जा आणि नॅनोतंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांत मोठी क्रांती होत आहे. अत्याधुनिक संशोधनाचा वापर आधुनिक पद्धतीने झाला पाहिजे. मूलभूत आणि उपयोजित विज्ञान संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर ही काळाची गरज आहे असे उद्गार केंद्रीय विद्यापीठ गुलबर्गा कर्नाटक येथील रसायनशास्त्राचे डॉ.शेषनाथ भोसले यांनी काढले. छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात विज्ञान शाखेने आयोजित केलेल्या मूलभूत आणि उपयोजित विज्ञान संशोधनातील उदयोन्मुख कल या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रावेळी ते बोलत होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील, उद्घाटक म्हणून स्वा.रा.ती.मराठवाडा विद्यापीठातील भौतिकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ.राजाराम माने, प्रमुख उपस्थिती किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव पी टी शिंदे, सहसचिव हिरागिर गिरी, कोषाध्यक्ष गुंडेराव पाटील, डॉ.अंबादास कदम, डॉ.शिंदे एस.एल.,डॉ. सोनवणे आर. एस., पृथ्वीराज पाटील, पुंडलिकराव पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.




आर.एम.मांजरे, आयक्केशीचे समन्वयक डॉ.विष्णू पवार यांची होती. यावेळी विविध संशोधकाच्या शोधनिबंधाचे युनिव्हर्सल रिसर्च ॲनालिसिस जर्नल या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. प्राचार्य डॉ.मांजरे यांनी महाविद्यालयाच्या उभारणीपासून आजपर्यंतचा इतिहास आणि महाविद्यालयाने ए प्लस ग्रेड घेतलेल्या सर्व घडामोडीचा वृत्तांत मांडला.

पुढे बोलताना डॉ.भोसले म्हणाले, विद्यार्थ्यांनी मेहनत करावी. संशोधनामध्ये वेळ द्यावा. त्याशिवाय प्रगती होत नाही. तर उद्घाटक डॉ. राजाराम माने म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण नवीन गोष्टी घेऊन आलेले आहे.अध्यापक आणि विद्यार्थ्यासाठी या गोष्टी आव्हानात्मक आहेत. सर्वांनी अभ्यासपूर्वक त्याची अंमलबजावणी करावी. अध्यक्षीय समारोप अध्यक्षाच्या वतीने पृथ्वीराज पाटील यांनी केला. त्यावेळी ते म्हणाले, सध्या विद्यार्थ्यांनी एआयचा वापर करावा. विद्यार्थ्यांचा कल जटील समस्या सोडवणे, नवीन साहित्य निर्मिती आणि आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाद्वारे व्यावहारिक उपाय शोधण्यावर केंद्रित असावा असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.उर्मिला शिरसे, डॉ.व्ही.के.भालेराव यांनी तर प्रास्ताविक डॉ. एच.ए.तिरपुडे यांनी आणि आभार डॉ.विष्णू पवार यांनी मानले. कार्यक्रमाला विविध महाविद्यालयातून आलेले संशोधक प्राध्यापक व विद्यार्थी, महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चाकूर तालूक्यात चार राष्ट्रवादी काँग्रेस व एक भाजप विजयी; पंचायत समितीवर राष्ट्रवादीची सत्ता

चाकूर,– प्रतिनिधी चाकूर : तालूक्यातील पाच जिल्हा परिषद व दहा पंचायत समितीच्या निवडणुकीची मतमोजणी झाली यात राष्ट्रवादी काँग्रेस चार व भाजपने एका जागेवर विजय मिळविला असून पंचायत समितीमध्ये आठ जागेवर विजय मिळवित राष्ट्रवादी काँग्रेसने सत्ता मिळवली आहे.

तहसील कार्यालयात निवडणुक निर्णय अधिकारी संगिता टकले, सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी नरसिंग जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणी करण्यात आली, निवडणुकीत ६७ टक्के मतदान झाले होते. सुरुवातील टपाली मतदानाची मोजणी करण्यात आली. दहा टेबलवर सर्वच गटाच्या मतमोजणीला एकाच वेळी सुरूवात झाली. यात पाच गटामध्ये राष्ट्रवादी काँगेस पक्षाने चार व भाजपने एका जागेवर विजय मिळविला आहे. पंचायत समितीच्या दहा जागेपैकी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आठ, भाजप दोन जागेवर विजय मिळविला आहे. विजयी होताच कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला.

विजयी झालेले उमेदवार पुढील प्रमाणे जिल्हा परिषद गट नळेगाव – अमर पाटील (भाजप), रोहिणा – उषा सोनकांबळे (राष्ट्रवादी काँग्रेस), वडवळ नागनाथ – भानुदास पोटे (राष्ट्रवादी काँग्रेस), चापोली – रंजना चाटे (राष्ट्रवादी काँग्रेस), जानवळ – दयानंद सुरवसे (राष्ट्रवादी काँग्रेस) हे विजयी झाले आहेत. पंचायत समितीच्या दहा गणात नळेगाव– शिवम देवशेटवार (भाजप), सुगाव – भुजंग शिंदे (राष्ट्रवादी काँग्रेस), जानवळ – सावित्रीबाई केदार ( राष्ट्रवादी काँग्रेस), झरी – मनिषा जाधव ( राष्ट्रवादी काँग्रेस), वडवळ नागनाथ – मिरावती कसबे( राष्ट्रवादी काँग्रेस), आष्टा – विजयमाला शेळके (भाजप), चापोली – गजानन होनराव( राष्ट्रवादी काँग्रेस ), अजनसोंडा – सुप्रिया हाके (राष्ट्रवादी कॉग्रेस), रोहिणा – जयश्री नागरगोजे (राष्ट्रवादी काँग्रेस), आटोळा – संतोष कलवले (राष्ट्रवादी काँग्रेस)




# रमाईंची सहनशीलता व कष्ट समजून घेणे गरजेचे : कांबळे

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर- माता रमाई भीमराव आंबेडकर यांनी संसाराचा गाडा समर्थपणे चालवत अपार कष्ट आणि विलक्षण सहनशीलतेचे दर्शन घडवले. शेण गोळा करून गोवऱ्या विकत बाबासाहेबांना परदेशात शिक्षणासाठी आवश्यक आधार दिला. रमाईंची सहनशीलता व कष्ट समजून घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन बौध्दाचार्य केशव कांबळे यांनी केले.

येथील वैशाली बुध्द विहार येथे माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या १२८व्या जयंतीनिमित्त शनिवारी रमाई यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी भगवान गौतम बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून बुध्द वंदना घेण्यात आली.

यावेळी कांबळे म्हणाले, रमाई यांनी काटकसरीने संसार सांभाळत दारिद्र्यावर मात केली. रमाईंच्या त्यागामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर बॅरिस्टर झाले आणि देशाला संविधान लाभले.

यामध्ये रमाईंचा मोठा वाटा आहे. आजच्या स्त्रियांनी रमाईंच्या सहनशीलता व कष्टांचा आदर्श घेऊन आपला संसार सुखी करावा, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी सूर्यभान लातूरकर, गौतम चिकाटे, उत्तम गायकवाड, हरिश्चंद्र सुरवसे, आनंद कांबळे, उदय सोनवणे, जगन्नाथ सुरवसे, अशोकाव सातपुते, आशा बानाटे, रमा चिकटे आदी उपस्थित होते.

# शिरूर अनंतपाळ तालुक्यातील जिल्हापरिषद व पंचायत समितीचा निकाल जाहीर

## साकोळ गटात काँग्रेसचे माणिक गायकवाड तर येरोळ गटात भाजपाच्या तुळसाबाई लोंढे विजयी

दै. अदिती एक्सप्रेस

शिरूर अनंतपाळ - - शिरूर अनंतपाळ तालुक्यातील जिल्हापरिषद व पंचायत समिती निवडणुकीचा निकाल ता.९ फ ब्रुवारी २०२६ रोजी शिरूर अनंतपाळ येथील तहसील कार्यालयाच्या सभागृहात निवडणूक निर्णय अधिकारी आहिल्या गाठाळ व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार किशोर यादव यांच्या आदेशानुसार जाहिर करण्यात आला.

त्यामध्ये येरोळ गटात काँग्रेसच्या शितल रमेश सोनवने ( ६३०२) यांचा पराभव करून भारतीय जनता पार्टीच्या तुळसाबाई जगदीप लोंढे यांनी (७३१२) मते घेऊन विजयी झालेल्या आहेत.

तर साकोळ गटात भारतीय जनता पार्टीचे विठ्ठल गुलाब वाघमारे ( ७८८६) यांचा पराभव करून या ठिकाणी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे माणिक दौलतराव गायकवाड (८४९३) हे विजयी झालेले आहेत.

तसेच चारही पंचायत समिती गणात वेगवेगळे निकाल जाहीर




होऊन त्यामध्ये साकोळ गणातील राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या आशा गजेंद्र सूर्यवंशी ( ३९०७) यांचा पराभव करून येथे भारतीय जनता पार्टीच्या मीना तुकाराम लांडगे ( ४२५७ ) विजयी झालेल्या आहेत. तसेच येरोळ गणात भाजपाच्या पुष्पमाला धनंजय मठपती (२८२१) यांचा पराभव करून येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पुनम खंडेराव चव्हाण पाटील यांचा विजय झालेला आहे. तसेच हिप्पळगाव गणातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ज्ञानेश्वर अंगद सुरवसे (२०९४) यांचा पराभव करून या ठिकाणी भारतीय जनता पक्षाचे संजय हरिश्चंद्र सूर्यवंशी (२४६८) विजयी झालेले आहेत. तर हिसामाबाद गणात राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे धोंडीराम यादवराव ढोक ( २८११) यांचा पराभव करून शिवसेनचे हमीद गोरेमिया सय्यद ( ३४५३) यांनी विजय मिळवलेला आहे. तालुक्यात गेल्या दहा बारा दिवसांपासून जिल्हापरिषद व पंचायत समितीच्या निवडणुक प्रचाराच्या रणधुमाळीत विविध राजकीय पक्षांसह प्रमुख पक्षांची जोरदार प्रचार यंत्रणा चालु असताना तालुक्यात विविध चर्चाला उधाण आले होते. त्याचाच काल अंतिम निकाल लागल्यानंतर तालुक्यातील गटात व गणात चौरंगी निकाल लागुन तालुक्यात सर्वच राजकीय पक्षाला गटाला व गणाला उमेदवार मिळालेले आहेत.

# उदगीरकरांचा विकासालाच कौल ; पाच जागा जिंकल्या : माजी मंत्री आ.संजय बनसोडे

## माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली युतीचे पाच उमेदवार विजयी

(जयप्रकाश पाटील)

उदगीर प्रतिनिधी- राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिन्ही जागा मोठ्या मताधिक्याने विजयी उदगीर मतदार संघात आमदार संजय बनसोडे यांची जादु कायम उदगीर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६ च्या निवडणुकीत उदगीर मतदार संघातील जनतेने मतदान करुन लोकशाही बळकट करण्यासाठी मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. यातुन नक्कीच जनसेवेचा वसा घेतलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व भारतीय जनता पार्टी या युतीचे पाच उमेदवार जिल्हा परिषद गटात निवडून आले आहेत. आता ग्रामीण



भागातील विकास होण्यासाठी मदत होणार असुन उदगीरच्या जनतेने विकासाला स्वीकारले असल्याचे मत माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

उदगीर नगर परिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व भारतीय जनता पार्टी या युतीचा झेंडा फडकवल्यानंतर आता उदगीर मतदार संघातील जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत वाढवणा, सोमनाथपुर, हेर, निडेबन, तोगरी या पाचही जागेवर युतीचे उमेदवार निवडून आले आहेत तर निडेबन, तोगरी, हेर या तिन्ही जिल्हा परिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या जागा मोठ्या मताधिक्याने निवडून आल्या आहेत. यामुळे आमदार संजय बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा मोठे यश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाट्याला आले आहे.

मतदार संघातील जनतेने विकासाच्या बाजूने कौल दिला असुन येत्या काळात ग्रामीण भागाच चेहरा - म ोहरा बदलून मतदार संघातील प्रत्येक गाव स्मार्ट व ग्रीन करण्यासाठी आम्ही प्रयत्न करुन सर्वसामान्य नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविणार असल्याचे सांगून मतदारांनी सात जिल्हा परिषदेच्या जागापैकी पाच जागावर युतीच्या बाजूने कौल दिल्याने मतदारांचे आ.संजय बनसोडे यांनी आभार व्यक्त करुन नवनिर्वाचित सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले आहे.

# लातुरात दोन टन गोमांस घेऊन जाणारे वाहन पकडले

लातूर- शहरातील कै. वसंतराव नाईक चौकात अंदाजे दोन टन गोमांसची वाहतूक करणाऱ्या वाहनास शिवाजीनगर पोलिसांनी रविवारी सकाळी पकडले. या प्रकरणी धाराशिव येथील एका आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे.

शहरातील राजीव गांधी चौक परिसरातून रविवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास एक पिकअप बोलेरो वाहन एमएच-२४-एयू-५२९२ कै. वसंतराव नाईक चौकाकडे भरधाव वेगात जात होते. या वाहनातून लाल रंगाचे पाणी गळत असल्याने एका गोरक्षकाने




संशय आल्याने वाहनाचा पाठलाग करून थांबविले व शिवाजीनगर पोलिसांना फोन करून माहिती दिली. पोलीस घटनास्थळी दाखल झाले. वाहन चालकाचे नाव, विचारले असता, त्याने शोएब शमशोद्दीन शेख (रा. खाजानगर, धाराशिव) असल्याचे सांगितले. पोलिसांनी सदर वाहन व चालकास शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आणले. पशुधन विकास अधिकारी डॉ. सतीश कानगुले यांना बोलावून पंचनामा करण्यात आला. सदर वाहनातून अंदाजे दोन टन गोमांस जप्त करण्यात आले. या प्रकरणी जोतिराम शेषराव क्षीरसागर यांच्या फिर्यादीवरून शोएब शमशोद्दीन शेख याच्याविरुध्द गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे.